सा.बीड
लक्ष्यवेध
अचुक लक्ष्य भेदणारे

संपादक : निलेश पुराणिक EDITOR- NILESH PURANIK Email Id- beedlakshyavedh@gmail.com

●वर्ष-३ रे ●अंक ४५ ●मंगळवार दि. ६ ऑक्टोबर २०२६ ●पाने ४ ●पोस्टल नंबर- L SB/Beed/RNP-255/2025-2027 ● आरएनआय नं.- MAHMAR/2023/89380 ● मुल्य २ रुपये

●Year-3 ●Paper- 45 ● Tuesday 29 October 2026 ●Page-4 ● Postal No. :- L SB/Beed/RNP-255/2025-2027 ● RNI :- MAHMAR/2023/89380 ● Price- 2 Rs.

वाचा आतील पानावर

- अग्रलेख-संकटात धावून येतो मारुतीराया!
- शुद्ध व सुरक्षित पाण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे पाणी स्रोतांच्या स्वच्छतेसाठी प्रशासनाला सहकार्य करावे -डीएचओ डॉ. उल्हास गंडाळ

डिघोळआंबा शाळेत विद्यार्थ्यांसोबत जिल्हाधिऱ्यांनी घेतला मध्यान्ह भोजनाचा आस्वाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जिल्ह्याचे सर्वोच्च अधिकारी जेव्हा शासकीय थाटमाट बाजूला ठेवून थेट ग्रामीण भागातील शाळेत पोहोचतात आणि विद्यार्थ्यांसोबत जमिनीवर बसून शालेय पोषणाचा आस्वाद घेतात, तेव्हा तो क्षण विद्यार्थ्यांसाठी केवळ कौतुकास्पद ठरत नाही, तर आयुष्यभरासाठी एक प्रेरणादायी आठवण बनतो. असाच काहीसा अनोखा आणि आपुलकीचा प्रत्यय अंबाजोगाई तालुक्यातील डिघोळआंबा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत पाहायला मिळाला. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मंगळवारी (दि. ५) या शाळेला अचानक भेट देऊन शैक्षणिक वातावरणाची प्रत्यक्ष पाहणी केली.

या अनपेक्षित भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी थेट वर्गात प्रवेश करत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मुलांचा अभ्यास, शाळेतील उपक्रम आणि त्यांची स्वप्ने याविषयी त्यांनी अत्यंत आपुलकीने चौकशी केली. या भेटीचे मुख्य आकर्षण ठरले ते मध्यान्ह भोजनाच्या वेळी! कोणत्याही प्रोटोकॉलला बाजूला सारत जिल्हाधिकारी जॉन्सन हे विद्यार्थ्यांसोबत जमिनीवर पंगतीत बसले आणि त्यांनी शालेय पोषण आहाराचा आस्वाद घेतला.

जेवणाचा आस्वाद घेत असतानाच त्यांनी विद्यार्थ्यांशी गप्पा मारल्या आणि त्यांच्या मनातील ध्येय जाणून घेतले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, उच्च शिक्षणासाठी आणि करिअरच्या निमित्ताने तुम्ही भविष्यात जगाच्या पाठीवर कुठेही गेलात, तरी आपल्या बीड जिल्ह्याविषयीची आत्मीयता आणि आठवणी मनात कायम जपा. तसेच मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा स्पर्धा व स्पर्धा परीक्षांच्या

◄◄पान २ वर

जि.प.च्या अंबाजोगाईच्या बांधकाम उपविभागात 1.75 कोटींचा अपहार

राहुल देशमुखच्या अपहाराने बांधकाम विभागाचे धाबे दणाणले!

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील जिल्हा परिषद बांधकाम उपविभागात वरिष्ठ सहायक तथा रोखपाल राहुल रावसाहेब देशमुख याच्यावर तब्बल १ कोटी ७५ लाख ४ हजार ७२३ रुपयांच्या शासकीय निधीच्या कथित अपहाराचा गुन्हा दाखल झाल्याने जिल्हा परिषद बांधकाम विभागातील आर्थिक व्यवहार आणि देयकांच्या प्रक्रियेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, हा प्रकार केवळ एका कर्मचार्याच्या गैरव्यवहारापुरता मर्यादित आहे की, जिल्ह्यातील इतर बांधकाम उपविभागांमध्येही अशाच पद्धतीने आर्थिक अनियमितता झाली आहे, याची आता सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. अंबाजोगाईतील प्रकरण उघडकीस आल्यानंतर तपासाची व्याप्ती वाढविल्यास आर्थिक अनियमिततेची आकडेवारी आणखी मोठी असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, १९ मार्च २०२० ते ३० जून २०२६ या कालावधीत राहुल देशमुख याने पदाचा गैरवापर करून मॅन्युअल कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी तसेच फरकाच्या हप्त्याच्या रकमेत गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. कार्यालयीन धनादेशांवर बनावट स्वाक्षर्या करून काही रक्कम रोखीने तर काही रक्कम आरटीजीएसद्वारे स्वतःच्या तसेच इतर व्यक्तींच्या खात्यावर वळविल्याचे तक्रारीत नमूद आहे. या व्यवहारांच्या खोट्या नोंदी कॅशबुकमध्ये करून बनावट अभिलेख तयार केल्याचाही आरोप आहे.या प्रकरणामुळे आता जिल्हा परिषद बांधकाम उपविभागातील अन्य आर्थिक व्यवहारांचीही तपासणी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. विशेषतः मागील काही वर्षांत मंजूर झालेली देयके, धनादेश, आरटीजीएस व्यवहार, कॅशबुक, मोजमाप पुस्तिका, कामांची पूर्णत्वाची नोंद आणि संबंधित अभिलेख तपासल्यास या प्रकरणाची व्याप्ती नेमकी किती आहे, हे स्पष्ट होऊ शकते.

अंबाजोगाई उपविभागात १ कोटी ७५ लाखांहून अधिक रुपयांचा कथित गैरव्यवहार समोर आला आहे. मात्र, हा प्रकार उघडकीस येण्यापूर्वी संबंधित आर्थिक व्यवहारांवर कितपत नियंत्रण ठेवले जात होते, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या इतर उपविभागांमध्येही अशाच प्रकारे देयके, निधी वितरण, कॅशबुक आणि इतर आर्थिक व्यवहारांमध्ये अनियमितता झाली आहे का, याची तपासणी होणे आवश्यक आहे.एकाच उपविभागातील प्रकरण समोर आले म्हणून तपास त्यापुरताच मर्यादित राहिला, तर मोठ्या चित्राचा उलगडा होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व बांधकाम उपविभागांतील मागील काही वर्षांचे आर्थिक व्यवहार तपासले तर अनियमिततेची आकडेवारी आणखी मोठी असण्याची शक्यता आहे का, याचा शोध घेणे गरजेचे आहे.जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत ग्रामीण भागात रस्ते, शाळा, अंगणवाडी, पाणीपुरवठा आणि इतर विकासकामे केली जातात. या कामांसाठी मोठ्या प्रमाणावर शासकीय निधी खर्च होतो. मात्र, अनेक कामांमध्ये देयके काढण्याच्या प्रक्रियेत नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत.

कामाची प्रत्यक्ष पूर्तता, मोजमाप, अभिलेखांची पूर्तता आणि वरिष्ठ अधिकार्यांची पडताळणी यानंतरच देयके मंजूर होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात या प्रक्रियेत अनियमितता होत असल्याचे आरोप केले जात आहेत. एकाच कामासाठी पुन्हा-पुन्हा देयके काढली गेली का, काम पूर्ण होण्यापूर्वी देयके अदा झाली का, मोजमाप पुस्तिकेत नोंदी आहेत का, पूर्णत्वाचे प्रमाणपत्र नियमानुसार आहे का, याची तपासणी होणे आवश्यक आहे.अंबाजोगाईतील प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा परिषदेच्या प्रत्येक बांधकाम उपविभागाची स्वतंत्रपणे चौकशी करण्याची मागणी होत आहे. मागील काही वर्षांतील सर्व देयके, निधी वितरण, धनादेश, आरटीजीएस व्यवहार, कॅशबुक, मोजमाप पुस्तिका, पूर्णत्वाच्या नोंदी आणि संबंधित विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी, अशी मागणी आहे.

विशेषतः एकाच कामावर वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये किंवा वेगवेगळ्या माध्यमातून किती रक्कम खर्च झाली, एकाच कामासाठी पुनरावृत्तीने देयके काढली का, देयक पारित करताना कोणकोणत्या अधिकार्यांनी पडताळणी केली आणि प्रत्यक्ष कामाच्या तुलनेत देण्यात आलेली रक्कम योग्य आहे का, याची तपासणी झाल्यास अनेक प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात.

१ कोटी ७५ लाखांहून अधिक रकमेचा कथित गैरव्यवहार अनेक वर्षे सुरू असल्याचा आरोप असल्याने केवळ एका कर्मचार्याला जबाबदार धरून प्रकरण संपवणे पुरेसे ठरणार नाही. कॅशबुक, धनादेश, आरटीजीएस व्यवहार, पीएफच्या रकमांची नोंद आणि इतर आर्थिक अभिलेखांची नियमित तपासणी होत असेल, तर एवढ्या मोठ्या रकमेचा व्यवहार संबंधित वरिष्ठ अधिकारी किंवा लेखापरीक्षण यंत्रणेच्या निदर्शनास का आला नाही, हा प्रश्न आहे.त्यामुळे या प्रकरणात संबंधित कर्मचार्याची जबाबदारी निश्चित करण्याबरोबरच आर्थिक व्यवहारांवर देखरेख ठेवणार्या अधिकारी-कर्मचार्यांची भूमिकाही तपासण्याची गरज आहे. नियंत्रण यंत्रणेत कुठे आणि कशी त्रुटी राहिली, याचा शोध घेणे आवश्यक आहे.

अंबाजोगाईतील १.७५ कोटींच्या कथित अपहाराचे प्रकरण गंभीर आहे. मात्र, या एका प्रकरणाच्या तपासातून संपूर्ण बांधकाम विभागातील आर्थिक व्यवहारांवर संशयाची छाया पडू नये, यासाठी प्रशासनानेच पारदर्शक चौकशी करणे आवश्यक आहे. अंबाजोगाईपुरताच हा प्रकार मर्यादित आहे की जिल्ह्यातील अन्य बांधकाम उपविभागांमध्येही आर्थिक अनियमिततेचे प्रकार घडले आहेत, हे तपासातून स्पष्ट होणे गरजेचे आहे.शासकीय निधी हा जनतेच्या विकासासाठी असतो. त्यामुळे निधीच्या प्रत्येक रुपयाचा हिशेब पारदर्शक असणे आवश्यक आहे. अंबाजोगाईतील प्रकरणाची व्याप्ती निश्चित करण्यासोबतच जिल्ह्यातील प्रत्येक बांधकाम उपविभागाची चौकशी झाल्यासच सत्य समोर येईल. त्यामुळे आता 'सीईओ काय कारवाई करणार?' आणि 'प्रत्येक बांधकाम उपविभागाची चौकशी होणार का?' हे दोन प्रश्न जिल्हा परिषद प्रशासनासमोर उभे राहिले आहेत.

बीडकरांसाठी पाण्याची व्यवस्था करा-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

शासनाने बीड तालुक्यात दुष्काळ जाहीर केला असून, या पार्श्र्वभूमीवर शहरात निर्माण झालेली पाणी टंचाई आणि विविध नागरी समस्या तातडीने सोडविण्याच्या मागणीसाठी भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंगळवारी (दि.६) नगरपरिषद प्रशासनाला निवेदन दिले. या गंभीर समस्यांवर कालमर्यादेत ठोस निर्णय घेऊन उपाययोजना न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा भाजपच्या वतीने देण्यात आला.

भाजपच्या बीड नगरपरिषदेच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्यासह भाजपचे नगरसेवक आणि उमेदवारांनी आपापल्या प्रभागातील विविध समस्यांचे निवेदन प्रशासनाकडे सादर केले. शहरातील पाणीटंचाई लक्षात घेता नळजोडणी नसलेल्या तसेच टंचाईग्रस्त भागांत अधिकृत टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा करावा, नवीन पाईपलाईनसाठी डीपीसीकडून तातडीने निधी मंजूर करून घ्यावा. टँकर वितरणातील गैरव्यवहार रोखण्यासाठी सर्व टँकर्सवर जीपीएस आणि क्यूआर कोड प्रणाली अनिवार्य करावी. तसेच शाहूनगर, बार्शी रोड आणि धानोरा रोड येथील पाणी भरणा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवून कडक देखरेख ठेवावी. अमृत अटल पाणीपुरवठा योजनेतील प्रलंबित क्रॉसिंगची कामे पूर्ण करावीत. पालिकेचा वीज खर्च कमी करण्यासाठी 'महाऊर्जा'च्या सहकार्याने समनापूर रोडवरील जागेवर चार कोटी रुपयांचा सौरऊर्जा प्रकल्प तातडीने राबवावा. शहरातील बंद बोअरवेल, हातपंप आणि मोटारपंप तातडीने दुरुस्त करून पाणी उपलब्ध करून द्यावे. आगामी नवरात्र महोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर बंद पथदिवे दुरुस्त करावेत तसेच मंजूर सोलर मिनी हायमास्ट तातडीने बसवावेत. स्वच्छता विभागाने सर्व प्रभागांत वेळेवर घंटागाड्या पाठवून नाल्यांमधून उपसलेला कचरा तत्काळ उचलावा. पाण्याची भीषण टंचाई संपेपर्यंत सिमेंट रस्ते आणि नाल्यांच्या बांधकामांना तात्पुरती स्थगिती द्यावी. टंचाईच्या काळात दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करून तक्रार निवारण कक्ष स्थापन करावा. यावेळी भाजपच्या बीड नगरपरिषद गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, डॉ.ज्योतीताई घुंबरे, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, माजी उपाध्यक्ष नसीर अन्सारी, नगरसेवक राणा चौहाण, शुभम धुत, ड. नागेश तांबारे, राजेंद्र गुजर, राहुल गुरखुदे, सनी माने, मुन्ना गायकवाड, नंदू पिंगळे, डॉ.लक्ष्मण जाधव, अनिल चांदणे, बाळासाहेब घोडके, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, शारेक जकेरिया, भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष शुभम कातांगळे, अमर विद्यागर, राजू महुवाले, सुशिल जाधव, डॉ.रमेश शिंदे, मिलिंद ठोकळ, किरण बेदरे, शिवराज शिरसाट आदी उपस्थित होते.

बुधवारी मेंटनन्सच्या नावाखाली महावितरणकडून ग्राहकांना विजेचा त्रास

बीड । प्रतिनिधी

महावितरणकडून वीजवाहिन्या व विद्युत यंत्रणेच्या देखभाल-दुरुस्तीच्या नावाखाली दर बुधवारी शहरासह विविध भागांतील वीजपुरवठा वारंवार खंडित केला जात असल्याने ग्राहकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. बुधवारी मेंटनन्सचे कारण देत दिवसातून अनेक वेळा वीज बंद केली जाते. विशेष म्हणजे आठवड्याच्या इतर दिवशीही अनेकदा जादा वेळ वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.वीजपुरवठा खंडित होण्याची पूर्वकल्पना ग्राहकांना देणे अपेक्षित असतानाही अनेक ठिकाणी पुरेशी माहिती मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. सकाळपासूनच वारंवार वीज ये-जा करत असल्याने घरगुती कामांसह व्यावसायिकांचे कामकाज, दुकाने,

◄◄पान २ वर